MHRG040001522025

<u>**दिवाणी चौकशी अर्ज क्र. ३०/२०२५**</u>

श्री. पांडुरंग हरिभाउ पाटील व इतर
विरुध्द
कोणीही नाही.

<u>**आदेश निशाणी क्र. १ वर**</u>

१. प्रस्तुत अर्ज बॉम्बे रेग्युलेशन अक्ट, १८२७ प्रमाणे वारस दाखला मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे कथन असे आहे की, **हरिभाऊ अर्जुन पाटील** यांचे **०१/०९/२०१६** रोजी मौजे मुर्बी, पो. खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले आहे. मयत हरिभाऊ अर्जुन पाटील यांची पत्नी नांगीबाई हरिभाऊ पाटील या दिनांक १६/०६/१९९५ रोजी मयत झाल्या आहेत. तसेच मयत हरिभाऊ अर्जुन पाटील यांची आई चैती अर्जुन पाटील या सुमारे ६० ते ७० वर्षांपूर्वीच मयत झाली आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत हरिभाऊ अर्जुन पाटील यांचे मुलगे आहेत. मयत हरिभाऊ अर्जुन पाटील यांना अर्जदार यांचेशिवाय इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदार हे मयत हरिभाऊ अर्जुन पाटील यांचे नावे असलेल्या अर्ज परिच्छेद क्र. २ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीसंदर्भात वारस आहेत असा दाखला मिळण्यासाठी त्यांनी विनंती केली आहे.

३. अर्ज व त्यासोबत सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुत अर्ज दाखल केल्यानंतर जाहिरनामा व जाहिर नोटीस जारी करण्याचा आदेश पारीत करण्यात आला. पुढे नमूद केल्याप्रमाणे जाहिरनामा व जाहिर नोटीस प्रसिध्द केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| जाहिरनामा | **नि.क्र.०८**<br><br>**नि.क्र.१५** | प्रसिध्द दिनांक १४/०२/२०२५<br>प्रसिध्द दिनांक २५/११/२०२५ |
| जाहिर नोटीस वृत्तपत्र<br>दैनिक '**रायगड नगरी** '<br>दैनिक '**रायगड नगरी** ' | **नि.क्र.२८**<br><br>**नि.क्र.२९** | प्रसिध्द दिनांक ०५/०८/२०२५<br>प्रसिध्द दिनांक १३/०१/२०२५ |

जाहिरनामा व जाहिर नोटीस प्रसिध्द केल्यानंतर मुदतीत किंवा आजपर्यंत प्रस्तुत अर्ज कथनास कोणीही व्यक्तिंनी हरकत घेतलेली नाही.

५. अर्ज कथनाचे पुष्टयर्थ अर्जदारांनी शपथेवर पुरावा सादर केलेला आहे. तसेच अर्जदारांनी खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा सादर केलेला आहे.

| **निशाणी क्र.** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|
| **१७ ते १९** | अर्जदार क्र. १ ते ४ यांची पुराव्याची प्रतिज्ञापत्रे. |
| **२१** | हरिभाऊ अर्जुन पाटील यांचे मृत्यु प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत. |
| **२२** | नांगीबाई हरिभाऊ पाटील यांचे मृत्यु प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत. |
| **२३** | अर्जात नमूद मिळकती संपादित केल्याबाबत शासनाने जाहिर केलेल्या |

| | |
|---|---|
| | अवार्ड केस नं.३४१ ची साक्षांकित प्रत. |
| **२४** | अर्जात नमूद इरादित भूखंड – मौजे तळोजा, ता.पनवेल, जि. रायगड येथील नोड – तळोजा II, सेक्टर क्र. २०, भूखंड क्र. २०, क्षेत्र ४०० चौ.मी. बाबतच्या इरादापत्राची पडताळणी केलेली प्रत. |
| **२५ ते २७** | अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या आधारकार्डांच्या पडताळणी केलेल्या प्रती. |
| **२०** | अर्जदारांची पुरावा बंद पुरशीस. |

६. अर्जदारांनी सादर केलेल्या पुराव्यावरुन असे दिसून येते की, मयताची मिळकत या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात आहे. अर्जदार हे मयत हरिभाऊ अर्जुन पाटील यांचे वारस आहेत. त्यामुळे अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | अर्जदार क्र. १ **श्री. पांडुरंग हरिभाऊ पाटील** व अर्जदार क्र. २ **श्री. अनिरुध्द हरिभाऊ पाटील** व अर्जदार क्र. ३ **श्री. अनंत हरिभाऊ पाटील** हे मयत **हरिभाऊ अर्जुन पाटील** यांचे कायदेशीर वारस आहेत असा दाखला देण्यात यावा. |
| ३. | अर्जदार यांनी सदर वारस दाखल्यावर महाराष्ट्र कोर्ट फी अक्टमधील शेडयुल–१ मधील आर्टिकल १२ सह आर्टिकल १० अन्वये आवश्यक तो मुद्रांक शुल्क दिल्यावर देण्यात यावा. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by NAYOMI PRAKASH PAWAR
Date: 2026.03.30 14:59:30 +0530

पनवेल. (नयोमी पी. पवार)

दिनांक – ३०/०३/२०२६ दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, पनवेल.